**परीक्षा प्राधान्य :**

क्र. मरापप/जीसीसी/प्रशा/अधिसूचना/जून-२०१५/
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१
दिनांक : २१/०२/२०१५.

**प्रति,**

**संस्थाचालक,**
**सर्व शासनमान्य टंकलेखन व लघुलेखन संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा : जून-२०१५ अधिसूचना व ऑनलाईन आवेदनपत्र स्विकृती कार्यक्रम.**

राज्यातील शासनमान्यता प्राप्त टंकलेखन / लघुलेखन संस्थामधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत जून-२०१५ मध्ये शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या टंकलेखन / लघुलेखन संस्थामार्फत परिषदेने विहित केलेल्या नमुन्यात विषय व गतीनिहाय स्वतंत्र आवेनदपत्रे ऑनलाईन मागविण्यात येत आहेत.

**परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :** उमेदवार शासनमान्य शाळेतून किमान ८ वी उत्तीर्ण असावा. शासनमान्य टंकलेखन/लघुलेखन संस्थेत आठवडयात किमान ४ तासांप्रमाणे परिक्षेच्या तारखेपूर्वी ४ महिने किंवा ८० कार्यालयीन तास नियमित विद्यार्थी म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे. (कार्यालयीन तास ४५ मिनिटांचा असतो.)

**परीक्षेचे वेळापत्रक :-**

| अ.क्र. | दिवस | वार | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पहिला | बुधवार | दि. ०३ जून २०१५ |
| २. | दुसरा | गुरूवार | दि. ०४ जून २०१५ |
| ३. | तिसरा | शुक्रवार | दि. ०५ जून २०१५ |
| ४. | चौथा | शनिवार | दि. ०६ जून २०१५ |
| ५. | पाचवा | रविवार | दि. ०७ जून २०१५ |

**शुल्कः-**

१. **परीक्षा शुल्क** :- रु. २००/- प्रतीविषय
२. **विलंब शुल्क** :- रु. २००/- परीक्षा शुल्क आणि विलंबशुल्क रु. २००/- असे एकूण रु.४००/-प्रतीविषय.
३. **नोंदणी शुल्क** :- टंकलेखन / लघुलेखन संस्थांसाठी रु. ५००/- प्रतीवर्षी.
(नोंदणी शुल्क जानेवारी ते डिसेंबर या कालावधीसाठी आकारण्यात येईल. वर्ष २०१५ चे नोंदणी शुल्क भरल्याच्या पत्राची व चलन अथवा डी.डी.ची छायांकित प्रत जोडावी.)

**शुल्क भरण्याची पध्दत**:- संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेत स्थळावर देण्यात आलेल्या **ऑनलाईन चलनाद्वारेच** भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत खाते क्रमांक 31178451983 वर भरावे. चलनाच्या तीन प्रतींपैकी दोन प्रती आवेदनपत्राच्या छायाप्रतीं सोबत जोडाव्यात. चलनाच्या पाठीमागे संस्थेचे नांव व संस्था कोड क्रमांकाचा शिक्का उमटवावा. **सदरच्या चलनाचा क्रमांक, दिनांक, रक्कम व शाखा कोड क्रमांक ऑनलाईन आवेदनपत्रामध्ये नमूद करावयाचा आहे**. सदर चलनाच्या माहिती शिवाय आवेदनपत्र भरता येणार नाही याची नोंद घेण्यात यावी. (इतर कोणत्याही चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये.)